**ठळक बातम्या**

- दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी भारत आणि फ्रान्समध्ये करार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यात मुंबईत चर्चा

- अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

- बारावीच्या परीक्षेत कॉपी प्रकरणी बीडमध्ये ७ शिक्षकांचं निलंबन, हिंगोलीतही शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल

**आणि**

- भालचंद्र नेमाडे, श्रीनिवास कुलकर्णी, संगीतकार अजय-अतुल यांना राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाचे विविध पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

दोन्ही देशाते नागरिक आणि कंपन्यांना दुहेरी कर द्यावा लागू नये यासाठी करार करण्याचा निर्णय भारत आणि फ्रान्स यांनी घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यासोबत मुंबईतल्या राजभवनात द्विपक्षीय चर्चेनंतर ही माहिती दिली.

**होल्ड - नरेंद्र मोदी**

आरोग्य, डिजिटल तंत्रज्ञान, विमान उद्योग यासारख्या क्षेत्रात संयुक्त उपक्रमही दोन्ही देश राबवणार आहे. दोन्ही नेत्यांनी यावेळी कर्नाटकातल्या हेलिकॉप्टर कारखान्याचं उद्घाटन केलं. फ्रान्सकडची तज्ञता आणि भारताकडचं कौशल्य एकत्र आल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

## होल्ड - नरेंद्र मोदी

फ्रान्स हा भारताच्या जुन्या मित्रांपैकी एक आहे. आता दोन्ही देशांचे संबंध Special global Strategic partnership पातळीवर नेल्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली. फ्रान्समध्ये स्वामी विवेकानंद कल्चरल सेंटर सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली. जागतिक स्थिरता आणि वैश्विक समृद्धीसाठी एकत्रितरित्या काम करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी मॅक्राँ यांना केलं. जगभरात विविध ठिकाणी असलेल्या संघर्षांवर शांततापूर्ण पद्धतीने तोडगा निघावा यासाठी दोन्ही देश कटीबद्ध आहेत. तसंच जागतिक आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी जागतिक संघटनांमध्ये बदल करण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

बहुतांश बाबतीत दोन्ही देशांचे विचार जुळतात आणि हे दोन्ही देशांच्या संबंधांना तेजी देणार वर्ष असल्याचं मॅक्राँ यावेळी म्हणाले. आतंकवादाविरोधातली लढाई कायम ठेवण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आणि मुक्त व्यापार कराराची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. या चर्चेपूर्वी मॅक्राँ यांनी २६/११ च्या मुंबई हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

भारत हा ग्लोबल साऊथचा एक विश्वासार्ह आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण आवाज बनला असून अधिक संतुलित आणि समावेशक जागतिक व्यवस्थेत आपलं योगदान देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालय आणि राज्य सरकारने संयुक्तरित्या आयोजित केलेल्या ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन या कार्यक्रमात दिलेल्या लेखी निवेदनात त्यांनी ही माहिती दिली. जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना भारत आशेचा किरण बनल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अलिकडच्या काळात भारताचे विविध देशांशी झालेले करार हे देशाच्या आर्थिक प्रगतीमुळे वाढलेल्या आत्मविश्वासाचं द्योतक आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत जागतिक आर्थिक सहकार्य परिषदेला संबोधित करत होते. सध्या जागतिक पातळीवर अनेक बदल होत असून हा काळ सगळ्यात अशांत काळ असल्याचं जयशंकर म्हणाले. अमेरिकेने भारतावर लादलेला आयात कर १८ टक्क्यापर्यंत कमी केल्याचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. या उद्घाटन सत्रात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही उपस्थित होते.

**<><><><><>**

हवामान बदलाचं आव्हान दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर बनत असून त्यावर तातडीनं कृती गरजेची असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित मुंबई क्लायमेट वीकचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. पर्यायी इंधनाचा वापर आणि पर्यावरण पूरक सोयी सुविधा यावर भविष्यात भर राहणार असून हवामान बदलाला तोंड देण्याच्या दृष्टीनं आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि आर्थिक पाठबळाची गरज असल्याचं ते म्हणाले. शेती, मत्स्यव्यवसाय आणि एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्थेवर याचा दुष्परिणाम जाणवू लागला आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयकडे सोपवावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळानं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा शिष्टमंडळात समावेश होता. त्यावेळी ही मागणी केल्याचं आणि यासंदर्भात केंद्रीय

गृहमंत्रालयाशी ताबडतोब पत्रव्यवहार करण्यात येईल असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बारामतीजवळ महिन्यापूर्वी कोसळलेल्या लिअरजेट 45 विमानाच्या कॉकपीट वाईस रेकॉर्डरमधला डेटा मिळवण्यासाठी , रेकॉर्डरच्या निर्मात्या कंपनीकडून विशेष सहाय्य मागवलं असल्याचं **विमान अपघात तपास कार्यालय** म्हटलं आहे. या विमानातले दोन्ही  रेकॉर्डर दुर्घटनेपूर्वी बराच काळ तीव्र तापमानात राहिल्याचं A A I B ने म्हटलं आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात इंग्रजीच्या पेपरला चौसाळा इथल्या परीक्षा केंद्रात कॉपी झाल्याचं उघड झालं आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनीच कॉपी दिल्यामुळे या प्रकरणी १७ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी सात शिक्षकांवर निलंबनाची कारवाई झाली असून उर्वरितांवरही लवकरच कारवाई केली जाईल, असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं आहे.  हिंगोली जिल्ह्यात वसमत इथेही बारावीच्या परीक्षेत कॉपीचा प्रकार घडला आहे. एका शिक्षकानेच सीसीटीव्ही कॅमेरा बंद करून विद्यार्थ्यांना उत्तरं सांगितल्याचा आरोप करण्यात आला असून या शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

साहित्य निर्मिती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करण्यासाठी शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केली. साहित्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक, ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे यांना जाहीर झाला आहे. १० लाख रोख आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. साहित्य क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी विंदा करंदीकर जीवन गौरव

पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीनिवास कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. दहा लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. तर मराठी प्रकाशन व्यवसायात लक्षणीय कार्य करण्यासाठीचा श्री. पु. भागवत पुरस्कार यंदा नांदेडच्या निर्मल प्रकाशन या संस्थेला जाहीर झाला आहे. पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. कलारत्न पुरस्कार संगीतकार अजय आणि अतुल गोगावले यांना जाहीर झाला आहे. तर विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार आळंदीच्या शांतिब्रह्म गुरुवर्य मारुतीबाबा कुरेकर यांना जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं रचल्याप्रकरणी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा आज विधान परिषदेच्या विशेषाधिकार समितीसमोर हजर राहिला. मात्र मुख्य तक्रारकर्ता प्रवीण दरेकर अनुपस्थित राहिल्याने समितीसमोरची सुनावणी १० मार्चला पुढे ढकलण्यात आल्याचं आमदार प्रसाद लाड यांनी सांगितलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे देखील समितीसमोर हजर राहिल्या. समितीने आपला जबाब नोंदवून घेतला नाही असं अंधारे आणि कामरा यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत अपक्ष निवडून आलेले ६ भाजपा बंडखोर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ३ सदस्य यांनी एकत्र येऊन 'सिंधुदुर्ग जिल्हा परिषद विकास आघाडी' नावाचा नवा गट स्थापन केला आहे. त्याचं अधिकृत पत्र त्यांनी आज जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्याकडे सुपूर्द केलं. इन्सुली मतदारसंघातून अपक्ष म्हणून विजयी झालेले नितीन राऊळ यांची गटनेते म्हणून सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीत भाजप आणि

शिवसेना, महायुती म्हणून एकत्र लढले होते. भाजपचे २७ आणि शिवसेनेचे १४ असे एकूण ४१ सदस्य निवडून आले होते, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तीन सदस्य विजयी झाले होते.

**<><><><><>**

मुंबई उपनगरी सेवेच्या तिकीट खरेदीशी संबधित ऑनलाईन सुविधा देणारं युटीएस हे ॲप १ मार्चपासून कायमस्वरुपी बंद होणार आहे. याऐवजी प्रवाशांनी आता ‘रेलवन’ हे ॲप डाऊनलोड करुन वापरावं असं आवाहन रेल्वेने केलं आहे. युटीएसवरुन काढलेल्या पासची कालमर्यादा १ मार्च नंतर असेल तर ते ‘रेलवन’वर ट्रान्स्फर करता येईल असं रेल्वेने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

इंदूरच्या देवी अहिल्या विद्यापीठातून सुषमा मोघे या ७८वर्षांच्या विद्यार्थिनीने मराठीत एम.ए. पदवीचं सुवर्णपदक पटकावलं आहे. मध्यप्रदेशच्या राज्यपाल मंगूभाई पटेल यांनी आज मोघे यांना सुवर्णपदक देऊन त्यांचा गौरव केला.

//<><><><><>//